कला अकादमी गोवा
पणजी-गोवा

कअ/हिंसंवि/२०२४-२५/११४६
दि. २७/०८/२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी "वार्षिक दिन" सोहळा संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम कला अकादमीच्या मा. दीनानाथ मंगेशकर सभागृहात दुपारी ठिक ३.३० वाजता संपन्न होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात "अमृताभिषेक" ह्या पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीतबद्य केलेल्या रचनांवर आधारीत गायन, वादन व नृत्याच्या आविष्काराने होणार आहे.

त्यामध्ये श्री. अवि परवार, कु. मुक्ता मिसर, कु. श्रृती नाईक, कु. वरद तारी, कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. राझी फळदेसाई, कु. सदानंद झो, कु. शौनक ओटावणेकर, कु. वसंत च्यारी, श्री. शिशीर शंखवाळकर, कु. आश्मी प्रभुदेसाई व कु. वंशिका प्रियोळकर हे विद्यार्थी गायनामध्ये सहभागी होणार असून नृत्याच्या सादरीकरणामध्ये कु. गौरी शानबाग, कु. कला नाग चैत्राली, कु. तीर्था शेटये, कु. अमिषा अडकोणकर, कु. जान्हवी प्रभु म्हांबरे, कु. गौरवी फडके, कु. प्रतिका मराठे, कु. ॲना मारीया, कु. श्रृती गावस, कु. उमा नाईक, कु. स्पुर्ती शानबाग, कु. सानवी धुपकर, कु. शिल्पा के. कु. श्रध्दा कुलकर्णी, कु. मंजीरी फुटणकर, कु. नेहाली किनळकर, व कु. श्राव्या शेट या विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाला श्री. सुरज मोरजकर, श्री. भार्गवराम गर्दे यांची तबला साथ, तसेच श्री. दत्तराज सुर्लकर यांची ऑर्गन साथ, श्री. रोहित वनकर यांची बासरी साथ, श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ व कु. कौस्तुभ च्यारी व कौशल कवळेकर यांची मंजिरी साथ लाभणार आहे.

या कार्यक्रमानंतर भारतीय संगीत व नृत्य विभाग तसेच कला अकादमीच्या संगीत केंद्रातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते प्रशस्त्रीपत्रके व पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे कला व संस्कृती व क्रिडा मंत्री आणि कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंद गावडे उपस्थित राहणार आहे. पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत, संगीत नाटक अकादमी नवी दिल्ली फेलोशीप प्राप्त व गोमंतकीय लोकसंस्कृतीचे गाढे अभ्यासक श्री. विनायक खेडेकर, हे खास आमंत्रीत म्हणून उपस्थित राहतील तर कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसठी खुला असून सर्व संगीत रसिक व विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थिती लावावी व कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)